रयत शिक्षण संस्था, सातारा.

इयत्ता - ६ वी | द्वितीय सत्र परीक्षा २०२४ - २५ | गुण - ४०

वेळ - २ .०० तास | विषय - समाजशास्त्र | पेजेस - ४

सूचना:- १) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

२) उजवीकडील अंक प्रश्नांचे गुण दर्शवितात.

३) प्रश्न क्रमांक १ ते ३ प्रश्न इतिहास व प्रश्न क्रमांक ४ व ५ नागरिकशास्त्र व ६ ते ९ भूगोल या विषयांवरील आहेत.

४) आवश्यक तेथे आकृत्या काढा.

## ( इतिहास )

१. रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहून वाक्य पूर्ण करा. २

१) चीनमध्ये तयार होणाऱ्या रेशमी कापडाला भारतात ..................... असे नाव होते. ( चीनांशुक, मिंग, फुनान )

२) कलिंग राज्याचा प्रदेश आजच्या ...................... राज्यात होता. ( आंध्रप्रदेश, उत्तर प्रदेश, ओडिशा )

२. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. ( कोणतेही ४ ) ४

१) सत्रपांमध्ये लढाया का सुरू झाल्या ?

२) पैठणचे प्राचीन काळातील नाव काय होते ?

३) प्राचीन भारतातील दोन आर्ष महाकाव्ये कोणती ?

४) गुप्त घराण्याचा संस्थापक कोण होता ?

५) कोणत्या मूल्यांना सम्राट अशोक महत्त्व देत असे ?

३. अ) खालील प्रश्नांची दोन-तीन वाक्यांत उत्तरे लिहा. ( कोणतेही ३ ) ६

१) प्राचीन भारतात कोणत्या भाषांमधून साहित्यनिर्मिती झाली ?

२) 'मुझिरीस' बंदरातून कोणत्या वस्तूंची निर्यात होत असे ?

३) समुद्रगुप्त वीणावादनात प्रवीण होता, हे कशावरून सिद्ध होते ?

४) 'गांधार शैली' याविषयी माहिती लिहा.

ब) खालील प्रश्नांची तीन ते चार वाक्यांत उत्तरे लिहा. ( कोणताही १ ) २

१) नालंदा विद्यापीठाची माहिती लिहा.

२) ऐतिहासिक वास्तूंना भेट दिल्यानंतर तुम्ही तेथील कोणती माहिती गोळा कराल ?

## ( नागरिकशास्त्र )

४. अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहून वाक्य पूर्ण करा. २

१) गावात राहणाऱ्या मतदारांच्या सभेला ...................... असे म्हणतात.

( ग्रामपंचायत, ग्रामसभा, ग्रामसेवक )

२) शहरी स्थानिक शासन संस्थांच्या निवडणुका दर ........................ वर्षांनी होतात. ( तीन, चार, पाच )

ब) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. ( कोणतेही २ ) २

१) नगरपंचायत कोणत्या ठिकाणी असते ?

२) न्यायव्यवस्थेच्या शिरोभागी कोणते न्यायालय असते ?

३) पंचायत समितीच्या सभापतीवर कोणती जबाबदारी असते ?

५. खालील प्रश्नांची तीन ते चार वाक्यांत उत्तरे लिहा. ( कोणताही १ ) २

१) ग्रामसभेच्या कार्यातील महिलांचा सहभाग स्पष्ट करा.

२) जलवाहिनी फुटल्यामुळे रस्त्यावर पाणी साठले आहे, अशा प्रसंगी तुम्ही काय कराल ?

## ( भूगोल )

६. अ) अचूक पर्याय निवडून विधाने पूर्ण करा. ३

१) उष्ण कटिबंधीय प्रदेशात प्रामुख्याने ..................... व्यवसाय आढळतात.

अ) प्राथमिक ब) द्वितीयक क) तृतीयक

२) पृथ्वीवर जमिनीचे प्रमाण ....................% आहे.

अ) ३५% ब) २९.२०% क) ७०.२०%

३) रायगड किल्ला वास्तूचा खडक ..................... प्रकारचा खडक आहे.

अ) अग्निजन्य ब) स्तरित क) रूपांतरित

ब) गटात न बसणारा शब्द ओळखा. २

१) अरबी समुद्र, भूमध्य समुद्र, मृत समुद्र, कॅस्पियन समुद्र

२) शंख, मासे, खेकडा, जहाज

७. अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. ( कोणतेही ३ ) ३

१) कोणत्या व्यवसायांना प्राथमिक व्यवसाय म्हणतात ?

२) खडक म्हणजे काय ?

३) पृथ्वीवरील कोणता समुद्र हा सर्वात क्षारयुक्त समुद्र म्हणून ओळखला जातो ?

४) मानव कोणते ऊर्जा साधन सर्वाधिक वापरतो ?

ब) खालील विधानांची भौगोलिक कारणे लिहा. ( कोणतेही २ ) ४

१) पर्यावरणपूरक ऊर्जा साधनांचा वापर गरजेचा आहे.

२) व्यवसायाचे प्रकार व्यक्तीचे उत्पन्न ठरवतो.

३) नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन करणे गरजेचे आहे.

८. अ) खालील दिलेला नकाशा लक्षपूर्वक अभ्यासा व त्याखालील दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. ( कोणतेही २ ) २

( नकाशा पान नं ४ वर पहावा )

१) भारतातील कोळसा क्षेत्रे असणारी राज्ये कोणती ?

२) गोदावरी नदीच्या खोऱ्यात कोणते खनिज साठे आढळतात ?

३) मुंबई हाय खनिजतेल क्षेत्र कोणत्या समुद्रात आहे ?

ब) खालील ओघतक्ता पूर्ण करा. ( कोणताही १ ) २

१) वनांतून मिळणारी उत्पादने

| फळे | | लाकूड | |
|---|---|---|---|

२) जगातील महासागर

| पॅसिफिक | | आर्क्टिक | |
|---|---|---|---|

९. खालील प्रश्नांची चार ते पाच वाक्यात उत्तरे लिहा. ( कोणतेही २ ) ४

१) महासागरातून मानव कोणकोणत्या गोष्टी मिळवतो ?

२) अग्निजन्य खडक व रूपांतरित खडक यांमधील फरक स्पष्ट करा.

३) मृदा तयार होणे कोणत्या घटकांवर अवलंबून आहे ?

प्र. क्र. ८ (अ) साठी नकाशा

